नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २७९ Issue - 279 | वार शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ Blow- Saturday Date 28 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## शिखर बँक घोटाळा प्रकरण बंद, अजितदादांना क्लीन चिट

### सुनेत्रा पवारांच्या अडचणी दूर, रोहित पवारांनाही दिलासा; ईडीचा हस्तक्षेप अर्जही फेटाळला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससी बँक) या राज्याच्या शिखर सहकारी बँकेत कर्जांचे वितरण करताना सुमारे २५ हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याच्या आरोपांच्या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते व माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक राजकीय नेत्यांना क्लीन चिट देणारा 'सी-समरी' अहवाल विशेष एसीबी न्यायालयाने शुक्रवारी स्वीकारला. यामुळे सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या गुन्ह्याचे प्रकरण कमकुवत होणार असल्याने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्याही अडचणी दूर होण्याची चिन्हे आहेत.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी विशेष एसीबी न्यायालयाचा हा महत्त्वाचा निर्णय आला आहे. 'गुन्हेगारी प्रकरण दिसत नाही', असे निरीक्षण नोंदवत न्यायाधीश महेश जाधव यांनी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेचा (ईओडब्ल्यू) 'सी-समरी' अहवाल स्वीकारला. तसेच या अहवालाच्या विरोधातील ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, माजी आमदार माणिकराव जाधव, दिवंगत माजी मंत्री शालिनीताई पाटील यांच्यासह अनेकांनी केलेल्या जवळपास ३० 'प्रोटेस्ट' याचिका न्यायालयाने फेटाळल्या, शिवाय ईडीचा हस्तक्षेप अर्जही फेटाळला.

विशेष म्हणजे 'ईओडब्ल्यू'च्या गुन्ह्याच्या आधारावर ईडीने गुन्हा दाखल केला आहे. त्यात साताऱ्यातील जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या खरेदीतील कथित गैरव्यवहारावरून ईडीने सुनेत्रा पवार यांचाही आरोपपत्रात उल्लेख केला आहे. या आरोपपत्राची दखल घेऊन विशेष पीएमएलए न्यायालयाने पूर्वी सुनेत्रा पवार यांच्याविषयीही गंभीर निरीक्षण नोंदवले होते. त्यामुळे त्या अडचणीत आल्या होत्या. त्यांच्याप्रमाणेच रोहित पवारही अडचणीत आले होते. कारण बारामती ॲग्रो कंपनीच्या कथित गैरव्यवहारांवरून ईडीच्या आरोपपत्राची दखल घेत पीएमएलए न्यायालयाने त्यांनाही समन्स बजावले होते. मात्र, आता 'ईओडब्ल्यू'चेच प्रकरण बंद झाले असल्याने ईडीचे प्रकरण कमकुवत झाले आहे. परिणामी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व आमदार रोहित पवार या दोघांनाही दिलासा मिळाला आहे. दरम्यान, एसीबी न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात 'प्रोटेस्ट' याचिका करणारे अनेक जण मुंबई उच्च न्यायालयात दाद मागण्याच्या तयारीत आहेत.

'शिखर बँकेतील त्या-त्या काळच्या संचालक मंडळांतील संचालकांनी तसेच कर्ज मंजुरी समित्यांनी अनेक सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या तसेच संचालकांचे हितसंबंध असलेल्या कंपन्यांना नियमबाह्य व सवलतीच्या दरांत कर्जांचे वितरण केले. अशा कर्जांची परतफेड न झाल्याने बँक डबघाईस आली आणि सरकारी तिजोरीचे २५ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले. याबाबत सप्टेंबर, २०१५मध्ये आरोपपत्र ठेवण्यात आले होते. फिर्यादी सुरिंदर अरोरा यांनी अनेक वर्षांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका केली होती. त्यातील आदेशानंतर 'ईओडब्ल्यू'ने अजित पवार यांच्यासह ७५ जणांविरोधात गुन्हा नोंदवून तपास केला होता.

मात्र, 'फिर्यादीचे सर्व आरोप हे दिवाणी स्वरूपाचे आहेत. शिखर बँकेने सहकारी संस्थांना मंजूर केलेली कर्जे व सरफेसी कायद्याप्रमाणे केलेली कार्यवाही याविषयी तपासात कोणत्याही दखलपात्र गुन्ह्याचे कृत्य आढळले नाही', असे नमूद करत 'ईओडब्ल्यू'ने 'सी-समरी' अहवाल (क्लोजर रिपोर्ट) पूर्वी न्यायालयात दाखल केला होता. त्याला अण्णा हजारे यांच्यासह अनेकांनी 'प्रोटेस्ट' याचिकांद्वारे आव्हान दिले होते. तो विषय न्यायालयात प्रलंबित असतानाच, राज्यातील तत्कालीन महाविकास आघाडीचे सरकार जाऊन महायुती सरकार अस्तित्वात आल्यानंतर 'ईओडब्ल्यू'ने आपल्या भूमिकेत बदल केला.

'प्रकरण बंद करायचे नसून आरोपांबाबत फेरतपास करायचा आहे', असे म्हणत 'ईओडब्ल्यू'ने तेव्हा न्यायालयाची परवानगी मिळवली. मात्र, त्यानंतर 'ईओडब्ल्यू'ने पुन्हा मार्च-२०२४ मध्ये 'क्लोजर रिपोर्ट' दाखल केला. 'आम्ही दुसऱ्यांदा केलेल्या तपासातही आरोपींविरोधात कोणतेही आक्षेपार्ह आढळलेले नाही', असे 'ईओडब्ल्यू'ने म्हटले. त्यालाही अण्णा हजारे, माणिकराव जाधव यांच्यासह अनेकांनी जवळपास ३० 'प्रोटेस्ट' याचिकांद्वारे आव्हान दिले होते. शिवाय ईडीनेही हस्तक्षेप अर्ज करून विरोध दर्शवला होता.

---

## भिवंडीत बंडखोरी करणे भाजपच्या नगरसेवकांना भोवणार? प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची सहा बंडखोरांना कारणे दाखवा नोटीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : चंद्रपूरनंतर अवघ्या राज्याचं लक्ष लागलेल्या भिवंडी महापालिकेच्या महापौरपदाची निवडणूक कि चांगलीच चर्चेत आली होती. यात अनेक राजकीय घडामोडीनंतर सेक्युलर फ्रंटचे पुरस्कृत उमेदवार नारायण चौधरी हे महापौर बनले आहेत. महापालिकेच्या स्व. विलासरावजी देशमुख सभागृहात झालेल्या निवडणूक प्रक्रियेनंतर हात वर करुन झालेल्या मतदानात चौधरी यांनी स्पष्ट बहुमत मिळवत भाजपला मोठा धक्का दिलाय. महापौरपदाच्या निवडणुकीत ऐनवेळेस भाजपमधून फुटून काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार) यांच्या सेक्युलर फ्रंटमध्ये ते दाखल झाले होते. काँग्रेसनेही नारायण चौधरी यांना महापौरपदाचे उमेदवार घोषित करत त्यांनाच मतदान करण्याबाबतचा व्हीप जारी केला होता.


## अरविंद केजरीवाल, सिसोदिया यांना न्यायालयाचा दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आज न्यायालयाने मोठा दिलासा देत कथित मद्य घोटाळ्यातून निर्दोष मुक्तता केली. न्यायालयाच्या या निर्णयानंतर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या प्रकरणावरून प्रतक्रिया देत केजरीवाल आणि सिसोदिया यांनी आपले देशहिताचे काम करत राहावं, असं म्हटलं आहे.

'दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया हे आमचेच कार्यकर्ते आहेत. मद्य धोरण गैरव्यवहार प्रकरणात त्यांना अटक झाल्यावर त्यावेळी मी जे बोललो त्यावेळी न्यायालयाचा निर्णय आला नव्हता. न्यायालयाचा निर्णय असता, तर मी असे बोललो नसतो. न्याय व्यवस्था सर्वोच्च आहे,' अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी व्यक्त केली.

मद्य धोरण गैरव्यवहारप्रकरणी केजरीवाल यांना अटक झाली त्यावेळी अण्णा हजारे यांनी त्यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली होती. आता केजरीवाल आणि सिसोदिया यांची न्यायालयातून निर्दोष सुटका झाली आहे. यासंबंधी प्रसारमाध्यामांनी विचारले असता हजारे यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीसंबंधी विचारले असता हजारे म्हणाले, 'लोकांची मागणी असेल तर सरकारने चौकशी केली पाहिजे. लोकांच्या भावना सरकारने विचारात घेतल्या पाहिजेत. मात्र, जी गोष्ट डोळ्याने पाहिली नाही, ऐकलीही नाही, त्यावर माझे वैयक्तिक काहीच मत नाही. त्यावर मी काही बोलू शकत नाही.'



न्यायालयाने दिलासा दिल्यानंतर अरविंद केजरीवाल यांना आज अश्रू अनावर झाले. आमच्याविरोधात संपूर्ण खोटी केस तयार करण्यात आली. 'आप'ला संपवण्यासाठी पंतप्रधान मोदी आणि अमित शाह या दोघांनी सर्वांत मोठं राजकीय षडयंत्र रचलं. आमच्या पक्षाच्या अनेक नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आलं. भारताच्या इतिहासात कधी घडलं नव्हतं ते घलं. मला सहा महिने आणि माजी उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांना दोन वर्षे तुरुंगात ठेवलं, पण आम्ही इमानदार असल्याचं आता कोर्टाने सांगितलं आहे, अशा भावना केजरीवाल यांनी व्यक्त केल्या.

---

## कोलंबिया निवडणुकीसाठी आंतरराष्ट्रीय निरीक्षक म्हणून सोलापूरचे जिल्हाधिकारी आशीर्वाद कुमार यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर /प्रतिनिधी : सोलापूरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. कुमार आशीर्वाद यांची प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय जबाबदारीसाठी निवड झाली आहे. महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोकलिंगम सेथुरामन यांच्या नेतृत्वाखालील पाच सदस्यीय शिष्टमंडळ ६ ते १० मार्च २०२६ दरम्यान कोलंबिया प्रजासत्ताकात अधिकृत दौऱ्यावर जाणार आहे.

**सोलापूरचे जिल्हाधिकारी कोलंबियात आंतरराष्ट्रीय निरीक्षक**

या शिष्टमंडळाला कोलंबियाच्या उप-ाशिक्षे छरलळेपरश्र एश्रशर्लीरश्र चे प्रमुख यांच्याकडून ८ मार्च रोजी होणाऱ्या काँग्रेस निवडणुकीसाठी आंतरराष्ट्रीय निरीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. भारताच्या निवडणूक आयोगाच्या Global Engagement for Electoral Excellence (GEEE) या उपक्रमांतर्गत ही नियुक्ती झाली असून, महाराष्ट्र राज्याला कोलंबियाशी विशेष संवाद व अनुभवविनिमयाची जबाबदारी देण्यात आली आहे.

शिष्टमंडळातील सदस्यांमध्ये श्री. आशीर्वाद कुमार यांच्यासह श्री. मनोहर रामचंद्र पारकर (संयुक्त मुख्य निवडणूक अधिकारी), श्री. प्रीयेश महाजन (निवडणूक नोंदणी अधिकारी, रामटेक), श्री. सागर शिर्के (बूथ लेव्हल अधिकारी, नाशिक) यांचा समावेश आहे. या दौऱ्यात भारतीय निवडणूक व्यवस्थेचा अनुभव जागतिक स्तरावर पोहोचविणे, तसेच कोलंबियातील निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करून सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास करणे हे उद्दिष्ट आहे.



सोलापूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब म्हणजे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची या आंतरराष्ट्रीय निरीक्षण मोहिमेसाठी निवड झाली असून, यामुळे भारतीय निवडणूक व्यवस्थेतील पारदर्शकता व विश्वासार्हतेला जागतिक मान्यता मिळत आहे.

## शरद पवारांसाठी राज्यसभा सोडण्यास उबाठा गटाचा नकार; आदित्य ठाकरेंची बैठकीला 'दांडी'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासाठी राज्यसभा सोडण्यास उबाठा गटाने नकार दिल्यामुळे महाविकास आघाडीत संघर्ष पेटण्याची चिन्हे आहेत. राज्यसभेच्या जागेसाठी कुठल्याही परिस्थितीत आम्ही आमचा दावा सोडणार नाही, आमच्या पक्षातील आमदारांनी उद्धव ठाकरेंसमोर आपले मत मांडले आहे. २०२० मध्ये आम्ही फौजिया खान यांच्या उमेदवारीवेळी मदत केली होती. मात्र, आमचे उमेदवार संजय पवार हे संख्याबळ असताना सुद्धा पराभूत झाले. आता आमचे संख्याबळ अधिक आहे. त्यामुळे जर आमचा खासदार कार्यकाळ पूर्ण करत असेल, तर आमच्याच पक्षाचा उमेदवार राज्यसभेसाठी जाईल, असे ते म्हणाले.

राज्यातील राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ मार्चला निवडणूक होत आहे. विद्यमान संख्याबळानुसार महाविकास आघाडीच्या वाट्याला केवळ एक जागा येईल. या जागेवर शरद पवार यांनी पुन्हा जावे, अशी इच्छा राष्ट्रवादीकडून (शरदचंद्र पवार गट) व्यक्त केली जात असतानाच ठाकरे गटाने त्यास नकार दिला आहे. वरुण सरदेसाई यांनी यावेळी २०२० मधील निवडणुकीचा संदर्भ देत राष्ट्रवादीला घरचा आहेर दिला. २०२० मध्ये आम्ही राष्ट्रवादीच्या फौजिया खान यांच्या विजयासाठी पूर्ण ताकद लावली होती. मात्र, त्यानंतर आमच्याकडे संख्याबळ असतानाही संजय पवार यांचा पराभव झाला. त्या अनुभवातून आम्ही शिकलो आहोत. आता संख्याबळानुसार आमचाच दावा मोठा आहे, असे सरदेसाई म्हणाले.

राज्यसभेच्या जागेवर तोडगा काढण्यासाठी महाविकास आघाडीने बोलावलेल्या दोन बैठकांना आमदार आदित्य ठाकरे यांनी दांडी मारली आहे. जागेच्या मुद्द्यावर तडजोड करण्यास उबाठा गटाचा विरोध असल्याचे समजते. विशेष म्हणजे विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या जागेवरही सरदेसाई यांनी हक्क सांगितला आहे. उद्धव ठाकरे यांचा कार्यकाळ पूर्ण होत असल्याने रिक्त होणारी विधान परिषदेची जागा आमचीच असेल. राज्यसभा आणि विधान परिषद हे दोन्ही स्वतंत्र विषय असून दोन्ही जागांवर आमचाच उमेदवार असेल, असेही त्यांनी सांगितले.

---

**शूर सैनिकांना शुभेच्छा व कृतज्ञता केली व्यक्त** | **प्रचंड हेलिकॉप्टर आत्मनिर्भरतेचे प्रभावी प्रतीक**

## भारत-पाक सीमेवर 'प्रचंड' हेलिकॉप्टरमध्ये सह-वैमानिक म्हणून राष्ट्रपती मुर्मू यांनी रचला इतिहास



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जयपूर : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुक्रवारी राजस्थान मधील जैसलमेर येथे स्वदेशी हलक्या लढाऊ हेलिकॉप्टर 'प्रचंड'मध्ये उड्डाण केले. भारत-पाकिस्तान सीमेच्या जवळ 'प्रचंड'मध्ये सह-पायलट म्हणून उड्डाण करत त्यांनी इतिहास रचला. स्वदेशी लढाऊ हेलिकॉप्टरमध्ये सह-पायलट म्हणून उड्डाण करणाऱ्या त्या पहिल्या राष्ट्रपती ठरल्या आहेत.

एलसीएच 'प्रचंड'ने जैसलमेर येथील भारतीय वायुदल (आयएएफ) स्थानकावरून उड्डाण केले. उड्डाणापूर्वी कॅप्टनने राष्ट्रपतींना आवश्यक माहिती दिली. ऑलिव्ह-हिरव्या रंगाची गणवेश आणि हेल्मेट परिधान करून त्यांनी कॉकपिटमधून हात हलवून उपस्थितांना अभिवादन केले. भारतीय सशस्त्र दलांच्या सर्वोच्च कमांडर या नात्याने राष्ट्रपतींनी उड्डाणादरम्यान कॉकपिटमधून देशाला संदेशही दिला. त्या म्हणाल्या, प्रचंड हेलिकॉप्टर आत्मनिर्भरतेचे प्रभावी प्रतीक आहे. सध्या मी जैसलमेर जिल्ह्यावरून उड्डाण करत आहे. आपल्या शूर सैनिकांना मी मनःपूर्वक शुभेच्छा आणि कृतज्ञता व्यक्त करते. तुम्हाला माझा सादर सलाम. जय हिंद, जय भारत.

हे उड्डाण सुमारे २५ मिनिटे चालले. हेलिकॉप्टर पोखरण फायरिंग रेंज वरून गेले, जिथे भारतीय वायुदल संध्याकाळी 'वायु शक्ति' या अग्निशक्ती प्रदर्शनाचे आयोजन करणार आहे. राष्ट्रपती मुर्मू दिवसा, संध्याकाळी आणि रात्री होणाऱ्या या प्रदर्शनाचे निरीक्षण करणार आहेत. यापूर्वी वायुदलप्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांनी जैसलमेर वायुदल स्थानकावर त्यांचे स्वागत केले.

आजच्या उड्डाणासह राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आक्रमक हेलिकॉप्टरमध्ये उड्डाण करणाऱ्या पहिल्या भारतीय राष्ट्रपती ठरल्या आहेत. अग्रिम मोर्चावरील लष्करी प्लॅटफॉर्मशी उच्चस्तरीय सहभागाच्या मालिकेतील ही आणखी एक महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. त्यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये अंबाला येथील वायुदल स्थानकावर डसॉल्ट राफेल (राफेल लढाऊ विमान) मध्ये उड्डाण केले होते. त्यामुळे भारतीय वायुदलाच्या दोन वेगवेगळ्या लढाऊ विमानांत उड्डाण करणाऱ्या त्या पहिल्या राष्ट्रपती ठरल्या. एप्रिल २०२३ मध्ये त्यांनी आसाम मधील तेजपूर वायुदल स्थानकावर सुखोई-३० एमकेआय लढाऊ विमानात सुमारे ३० मिनिटांचे उड्डाण केले होते. या दरम्यान त्यांनी ब्रह्मपुत्रा आणि तेजपूर खोऱ्यावरून उड्डाण करत हिमालयास चे विहंगम दृश्य अनुभवले.

एलसीएच 'प्रचंड' हे भारताचे पहिले स्वदेशी डिझाइन आणि विकसित केलेले लढाऊ हेलिकॉप्टर आहे. याची निर्मिती हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड - एचएएल यांनी केली आहे. प्रगत एव्हिऑनिक्स, स्टेल्थ वैशिष्ट्ये, रात्रीच्या हल्ल्याची क्षमता तसेच एअर-टू-ग्राउंड आणि एअर-टू-एअर क्षेपणास्त्रे, रॉकेट्स आणि २० मिमी तोफ यांसारख्या अत्याधुनिक शस्त्रसज्जतेमुळे एलसीएच भारतीय वायुदलाची युद्धक्षमता लक्षणीयरीत्या वाढवतो.

## संपादकीय....

# क्लीन चीट

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससी बँक) या राज्याच्या शिखर सहकारी बँकेत कर्जांचे वितरण करताना सुमारे २५ हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याच्या आरोपांच्या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते व माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक राजकीय नेत्यांना क्लीन चिट देणारा 'सी-समरी' अहवाल विशेष एसीबी न्यायालयाने शुक्रवारी स्वीकारला. यामुळे सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या गुन्ह्याचे प्रकरण कमकुवत होणार असल्याने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्याही अडचणी दूर होण्याची चिन्हे आहेत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी विशेष एसीबी न्यायालयाचा हा महत्त्वाचा निर्णय आला आहे. 'गुन्हेगारी प्रकरण दिसत नाही', असे निरीक्षण नोंदवत न्यायाधीश महेश जाधव यांनी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेचा (ईओडब्ल्यू) 'सी-समरी' अहवाल स्वीकारला. तसेच या अहवालाच्या विरोधातील ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, माजी आमदार माणिकराव जाधव, दिवंगत माजी मंत्री शालिनीताई पाटील यांच्यासह अनेकांनी केलेल्या जवळपास ३० 'प्रोटेस्ट' याचिका न्यायालयाने फेटाळल्या, शिवाय ईडीचा हस्तक्षेप अर्जही फेटाळला. विशेष म्हणजे 'ईओडब्ल्यू'च्या गुन्ह्याच्या आधारावर ईडीने गुन्हा दाखल केला आहे. त्यात साताऱ्यातील जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या खरेदीतील कथित गैरव्यवहारावरून ईडीने सुनेत्रा पवार यांचाही आरोपपत्रात उल्लेख केला आहे. या आरोपपत्राची दखल घेऊन विशेष पीएमएलए न्यायालयाने पूर्वी सुनेत्रा पवार यांच्याविषयीही गंभीर निरीक्षण नोंदवले होते. त्यामुळे त्या अडचणीत आल्या होत्या. त्यांच्याप्रमाणेच रोहित पवारही अडचणीत आले होते. कारण बारामती ॲग्रो कंपनीच्या कथित गैरव्यवहारांवरून ईडीच्या आरोपपत्राची दखल घेत पीएमएलए न्यायालयाने त्यांनाही समन्स बजावले होते. मात्र, आता 'ईओडब्ल्यू'चेच प्रकरण बंद झाले असल्याने ईडीचे प्रकरण कमकुवत झाले आहे. परिणामी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व आमदार रोहित पवार या दोघांनाही दिलासा मिळाला आहे. दरम्यान, एसीबी न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात 'प्रोटेस्ट' याचिका करणारे अनेक जण मुंबई उच्च न्यायालयात दाद मागण्याच्या तयारीत आहेत. 'शिखर बँकेतील त्या-त्या काळच्या संचालक मंडळांतील संचालकांनी तसेच कर्ज मंजुरी समित्यांनी अनेक सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या तसेच संचालकांचे हितसंबंध असलेल्या कंपन्यांना नियमबाह्य व सवलतीच्या दरांत कर्जांचे वितरण केले. अशा कर्जांची परतफेड न झाल्याने बँक डबघाईस आली आणि सरकारी तिजोरीचे २५ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले. याबाबत सप्टेंबर, २०१५मध्ये आरोपपत्र ठेवण्यात आले होते. फिर्यादी सुरिंदर अरोरा यांनी अनेक वर्षांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका केली होती. त्यातील आदेशानंतर 'ईओडब्ल्यू'ने अजित पवार यांच्यासह ७५ जणांविरोधात गुन्हा नोंदवून तपास केला होता.

# मायबोलीत बोलू या! चला मराठीतच बोलू या!!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मराठी भाषा हजारो वर्षांच्या इतिहासाने समृद्ध आहे. ही भाषा केवळ संवादाचे साधन नाही, तर आपल्या संस्कृतीचे, ऐतिहासिक परंपरेचे आणि सृजनशीलतेचे जिवंत प्रतीक आहे. 'माय मराठी' या संकल्पनेत तिचे शुद्ध, प्रमाण आणि अभिजात रूप जितके महत्त्वाचे आहे, तितकेच विविध उपभाषांनी वाढवलेले तिचे वैविध्यही महत्त्वाचे आहे.

मराठी ही उपभाषांनी समृद्ध झालेली भारतातील एक प्रमुख भाषा आहे.मातृभाषा आपले अस्तित्व असते.बोलीभाषा माणसाची अस्मिता असते. प्रत्येक बोलीत तिचा वेगळा रंग, वेगळी लय आणि वेगळे चैतन्य तसेच लोकजीवनाचे प्रतिबिंब सामावलेले आहे. त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना जगातील एका अभिमानास्पद भाषेला आपण 'माय मराठी' म्हणतो, याचा आत्मीय अभिमान बाळगण्याचा हा दिवस आहे.

हा दिवस प्रत्येक मराठी माणसाने व्यवहारात, शिक्षणात, प्रशासनात, माध्यमांमध्ये आणि दैनंदिन संभाषणात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याचा संकल्प करण्याचा आहे.

**मराठी भाषा गौरव दिन : २७ फेब्रुवारी**

वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठी साहित्य आणि भाषेच्या समृद्धीसाठी त्यांनी केलेल्या कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

२१ जानेवारी २०१३ रोजी मराठी भाषा विभागाने अधिकृतपणे या दिनाची घोषणा केली. तसेच ३ ऑक्टोबर रोजी राज्यात 'अभिजात मराठी भाषा दिन' साजरा केला जातो. तर दरवर्षी दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतनिमित्त १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. राज्यभरात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम, वाचन उपक्रम आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या दोन्ही दिवसांत राज्यभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

मराठी भाषेचा गौरव करण्याबरोबरच तिच्या संवर्धनासाठी आणि विस्तारासाठी चिंतन करण्याची ही संधी असते. चला, यावर्षी मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीला समृद्ध करणाऱ्या उपभाषांचा वाटा समजून घेऊया.

**विविध उपभाषांचा समृद्ध वारसा**

महाराष्ट्रात विविध बोलीभाषांचा विपुल वापर आढळतो. नाथ, महानुभाव आणि वारकरी संत परंपरेतील संतांनी प्राचीन काळापासून विविध बोलींचा वापर करून मराठी भाषेला अधिक व्यापक केले. आपण सर्वांनी आपल्या बालपणी चिमणी आणि कावळ्याची गोष्ट ऐकली आहे...तुम्हाला माहिती आहे, श्री. चक्रधर स्वामींनी ही गोष्ट आठशे वर्षांपूर्वी रुसलेल्या एका मुलीला सांगितल्याची नोंद लीळाचरित्रात आहे. कविश्रेष्ठ कालिदास, शूद्रक यांच्या शाकुंतल, मृच्छकटिक या नाटकांमध्ये अनेक संवाद मराठी बोली भाषेत आहेत.

वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, मालवणी, कोल्हापुरी, मराठवाडी, नागपुरी, झाडीबोली, खानदेशी, गोंडी, बंजारा, कोलामी अशा असंख्य उपभाषा मराठीच्या समृद्ध परंपरेचा भाग आहेत. प्रत्येक उपभाषेला स्वतंत्र ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे.

जशा अनेक उपनद्या मिळून नदी अधिक विशाल आणि समृद्ध होते, तशाच या उपभाषांनी मराठी भाषेला गोडवा, विस्तार आणि ऊर्जा दिली आहे.

उदाहरणार्थ, वऱ्हाडी ही अत्यंत प्रभावी उपभाषा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' मध्ये वऱ्हाडी भाषेचा प्रभावी वापर दिसतो. त्यांनी संपूर्ण गावगाडाच मराठीत मांडला आहे. तसेच संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनांमधूनही वऱ्हाडीचा सहज आणि प्रभावी उपयोग आढळतो.आचार्य प्र.के.अत्रे यांनी गाडगेबाबांच्या वऱ्हाडी संबोधनाचे जाहीर कौतुक केले आहे.

कोकणी व मालवणी बोली त्यांच्या खास गोडव्यासाठी ओळखल्या जातात, तर कोल्हापुरी बोली तिच्या रांगड्या ठसक्यासाठी प्रसिद्ध आहे. झाडीबोली आणि गोंडी भाषेच्या प्रभावामुळे महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा जतन झाला आहे. झाडीबोलीतील नाटकांची परंपरा महाराष्ट्राला ज्ञात आहे. खानदेशी आणि अहिराणी भाषेचा गोडवा बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून प्रत्ययास येतो.

उपभाषांवर प्रादेशिक प्रभाव असतो. उदाहरणार्थ, कोकणी मराठीवर कन्नडचा प्रभाव जाणवतो. 'अक्का' हा मोठ्या बहिणीसाठी वापरला जाणारा गोड शब्द कन्नड–तेलुगू भाषांमधून मराठीत रूढ झाला आहे. वऱ्हाडीमध्ये, झाडीबोलीत हिंदीचे, तर अहिराणीमध्ये गुजरातीचे अनेक शब्द सहजपणे मिसळलेले दिसतात. खरे तर हीच भाषेची खरी ताकद आहे–स्वीकारण्याची आणि समृद्ध होण्याची!

**मराठी भाषेचे संवर्धन आणि विकास**

उपभाषांनी मराठीला अधिक व्यापक आणि अभिव्यक्तिपूर्ण बनवले आहे. राज्य शासनाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषा संवर्धक, अभ्यासक, संशोधक, लेखक आणि साहित्यिक यांचा सन्मान करण्याचे निर्देश दिले आहेत.

भाषाविषयक स्पर्धा, परिसंवाद, व्याख्याने आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात. विविध शासकीय कार्यालयांमध्ये त्रिभाषा सूत्राचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला जात आहे. मराठीचा प्रशासनिक, शैक्षणिक आणि सामाजिक वापर वाढवणे ही काळाची गरज आहे.

शासन प्रयत्नशील आहेच; परंतु सर्वसामान्यांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी विविध बोलीभाषांचा अभ्यास करून त्यांचा अभिमान बाळगला पाहिजे. भाषेचे संवर्धन हे केवळ धोरणातून नाही, तर व्यवहारातून होते.

**मराठीचा वापर वाढवू या!**

'उपभाषांनी समृद्ध झालेली माय मराठी' हा विचार मराठीच्या सर्वांगसुंदरतेची जाणीव करून देतो. भाषा ही आईसारखी असते–विशाल, सामावून घेणारी आणि ममत्वाने ओथंबलेली.

महाराष्ट्रात येणारा कोणताही व्यक्ती या भाषेचा गोडवा अनुभवतो आणि सोबत घेऊन जातो. 'तुम्हाला मराठी येते म्हणजे तुम्ही मराठी आहात' हा या भाषेचा उदात्त बाणा आहे.

त्यामुळे आज मराठी भाषा गौरव दिनाला जागतिक स्तरावर मराठीचा सन्मान टिकवण्यासाठी आम्ही सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे यासाठी..

- मराठी माध्यमातील शिक्षणाचा प्रसार
- मराठी शाळांचे अस्तित्व टिकवणे
- आधुनिक माध्यमांवर मराठीत अभिव्यक्त होणे
- दैनंदिन व्यवहारात मराठीचा जाणीवपूर्वक वापर

ही अत्यावश्यक पावले आहेत.

दिवंगत कवीवर्य डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी मराठीच्या सामर्थ्याचे सुंदर वर्णन केले आहे–

मराठीची प्रतिभा, ज्ञानेश्वरीत समावते
ग्रामगीता गाथाही, मराठीतच मावते
लावणीतून मराठीचे, सौंदर्य ओसंडते
शौर्य आणि औदार्य, पोवाड्यातून सांडते
मराठीनेच तुकड्याला तुकडोजी केले
गाडगेबाबा मराठीतच जन्म घेऊन गेले
अमृताशी पैज जिंकते, मराठी बोली
आभाळाची उंची जिच्यात, समुद्राची खोली
साऱ्यांनी मराठी हुंकारावर डोलावे
मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलावे..!

चला मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया, मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलूया..!

**– प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

# सुरक्षेच्या कारणास्तव विमानतळ परिसरात नमाज अदा करण्याची परवानगी देता येणार नाही, राज्य सरकारची हायकोर्टात भूमिका



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज डोमेस्टिक विमानतळ परिसरात म्हणजेच टी–१ जवळ सुरक्षेच्या कारणास्तव एकाचवेळी हजारो लोकांना नमाज अदा करण्याची परवानगी देता येणार नाही, असं राज्य सरकारनं गुरूवारी (२६ फेब्रूवारी) मुंबई हायकोर्टात स्पष्ट केलं. यासंदर्भातील याचिकेवर न्यायमूर्ती बी.पी. कुलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोश पुन्नीवाला यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी रमजानच्या महिन्यातील नमाज अदा करण्याकरता आसपासच्या परिसरातील मशिदींचा वापर करता येऊ शकतो, असा पर्याय विमानतळ प्रशासनानं हायकोर्टाला सुचवलाय. मात्र सुरक्षेसोबत कोणतीही तडजोड न करता त्याच परिसरात तात्परत्या स्वरूपात नमाज अदा करण्यासाठी पर्यायी जागा देता येईल का?, यावर ५ मार्चच्या पुढील सुनावणीत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश हायकोर्टानं राज्य सरकारला दिलेत.

काय आहे प्रकरण? : साल १९९५ पासून गेल्या तीन दशकांपर्यंत या परिसरात अस्तित्त्वात असलेली नमाज अदा करण्यासाठीची एक तात्पुरती शेड एमएमआरडीएनं एप्रिल २०२५ मध्ये तोडली. त्यामुळं रमजानच्या महिन्यात होणारा त्रास वाचवण्यासाठी या परिसरात गेली ३० वर्षे उपलब्ध असलेली रमजानची नमाज अदा करण्यासाठी ही शेड तातडीनं पुन्हा बांधून द्यावी, अशी मागणी करत येथील तब्बल दोन हजार रिक्षा–टॅक्सी आणि ओला–उबर चालकांनी हायकोर्टात याचिका दाखल केलीय. या ठिकाणी केवळ रिक्ष टॅक्सी चालकच नाही तर आसपासच्या हॉटेलात तसंच विमानतळावर काम करणारे, विमानतळावर ये–जा करणारे हजारो मुस्लीम बांधवही नमाज अदा करतात, अशी माहिती याचिकाकर्त्यांकडून कोर्टाला देण्यात आली. यावर मानवतेच्या दृष्टीनं विचार केल्यास संभाव्य संघर्ष टाळता येईल, अशी सूचना हायकोर्टानं प्रशासनाला केलीय.

राज्य सरकारकडून सुरक्षेच्या मुद्यावर परवानगी देण्यास नकार : याबाबत राज्य सरकारच्यावतीनं उत्तर देताना सरकारी वकील ज्योती चव्हाण यांनी कोर्टाला सांगितलं की, टी– १ च्या गेट नंबर ९ जवळ अशी जागा उपलब्ध आहे. मात्र हा व्हीव्हीआयपी गेट असून दिवसभर इथं अतिम हत्त्वाच्या व्यक्तींची येजा सुरू असते. अशावेळी तिथं दिवसातून पाचवेळा एकाचवेळी १५०० ते २००० लोकं जमू लागली तर बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांना परिस्थिती हाताळणं कठीण होऊन बसेल. त्यामुळं सुरक्षेच्या कारणास्तव इथं तात्पुरती शेड टाकून नमाज पठणाला परवानगी देता येणार नाही. याकरता याचिकाकर्ते आसपसाच्या परिसरातील मशिदींचा वापर करू शकतात. या परिसरात १ ते ३ किमीच्या परिघात तीन मशिदी उपलब्ध आहेत. ज्या १५ ते २० मिनिटांच्या पायी अंतरावर आहेत. तसंच या लोकांकडे स्वत:ची रिक्षा किंवा टॅक्सी आहे, त्यामुळं त्यांना तिथं ये–जा करण्यात काहीच अडचण नाही.

हायकोर्टाचे निर्देश काय? : दरम्यान, या याचिकेवर न्यायमूर्ती बी.पी. कुलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोश पुन्नीवाला यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावर हा अतिशय संवेदनशील विषय असल्यानं एमएमआरडीएनं मानवतेच्या दृष्टीकोनातून विमानतळ परिसरात नमाज अदा करु द्यावा. कारण या रिक्षा–टॅक्सी चालकांनी जर आंदोलनाच्या पवित्र्यात जर प्रवाशांची भाडी नाकारल्यास प्रवाशांचे प्रचंड हाल होतील. तेव्हा याचा गांभीर्यानं विचार करत या परिसरात तात्पुरती पर्यायी जागा देण्याचा विचार करवा, असे निर्देश देत हायकोर्टानं ही सुनावणी ५ मार्चपर्यंत तहकूब केलीय.

# 'महावितरण'ने उत्पन्न वाढीसाठी 'आयपीओ' आणून 'कॉर्पोरेट गव्हर्नन्स' चा अंमल करावा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असलेल्या बाजारपेठेचा लाभ उठवित महावितरणने आयपीओ (इनिशियल पब्लिक ऑफरिंग) आणत उत्पन्नाचा कायमस्वरूपी स्रोत निर्माण करून तोट्याकडून नफ्याकडे वळावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देत कंपनीने आपल्या कारभारात 'कॉर्पोरेट गव्हर्नन्स' चा अंमल करण्याच्या सूचनाही मुख्यमंर्त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ऊर्जा विभागाने एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड कंपनी निर्माण केली आहे. नवीन कंपनीमुळे कृषी क्षेत्राच्या दायित्वापोटी सध्या तोट्यात असलेल्या महावितरण कंपनीचे विभाजन झाल्यामुळे कंपनी नफ्यात आलेली दिसेल. या कंपनीचे कार्यान्वयन सुरू करण्याची सूचनाही त्यांनी दिली.

कृषी क्षेत्राच्या राज्य शासनाच्या हमीची रक्कम कंपनीला येणाऱ्या वित्त आयोगाच्या निधीतून देण्यात यावी. नवीन सोलर ॲग्रो पावर लिमिटेड कंपनीला ठराविक मर्यादेपर्यंत आणि कालावधीसाठी शासनाच्या वतीने अनुदान देण्यात येईल. त्यानंतर कंपनीला स्वत:च्या उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करावे लागतील. जेणेकरून भविष्यात शासनाकडे निधी मागणीची वेळ येणार नाही, असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

भांडवली बाजारात कंपनीने 'आयपीओ' च्या माध्यमातून प्रवेश केल्यास मोठ्या प्रमाणावर समभाग धारकांकडून गुंतवणूक होऊन कंपनीसाठी निधी उपलब्ध करता येईल. सध्या कंपनीची ७६ हजार १८९ कोटी रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये ५९ हजार ५२७ कोटी रुपये कृषी क्षेत्राशी सबंधित आहेत. कंपनीला स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी आर्थिक पुनर्रचनेची गरज आहे. शासनाकडून हमी स्वरूपात असलेल्या ३२ हजार ६७९ कोटी देण्याबाबत टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात यावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. भारत सरकारच्या प्रस्तावित योजनेनुसार राज्य शासन जीएसडीपीच्या (सकल राज्य देशांतर्गत उत्पादन) ०.५ टक्के रक्कम महावितरणला मिळण्यासाठी प्रयत्न करावे. प्रस्तावित पुनर्रचना योजनेच्या अंमलबजावणीनंतर निधी मागण्याची आवश्यकता राहणार नसल्याने शासनाची बचत होणार आहे. यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून कार्यवाही पूर्ण करावी.

बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ . पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा तसेच संचालक उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा यांनी सादरीकरण केले.

# दहिसर नदी प्रदूषण रोखण्यासाठीच्या प्रकल्पांचे काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होणार : राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दहिसर नदीतील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी सुरू असलेल्या प्रकल्पांचे काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे, असे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले. दहिसर (मुंबई) नदीतील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत आमदार अबू आझमी यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नास उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ बोलत होत्या.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले की, दहिसर नदी परिसरातील गोठ्यांच्या स्थलांतराची प्रक्रिया सुरू असून त्यासाठी जागाही निश्चित करण्यात आली आहे. महसूल विभागाने संबंधित नकाशा जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला असून आर्थिक तरतूदही करण्यात आली आहे. गोठे हलविण्याबाबत मुंबई महानगरपालिकेला निर्देश देण्यात आले असून, नोटिस देऊन स्थलांतराची कारवाई सुरू आहे.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी, मुंबई प्रदूषण नियंत्रण मंडळाने नदी प्रदूषण रोखण्यासाठी आतापर्यंत कोणती कारवाई केली, याची माहिती सभागृहात सादर करण्याचे निर्देश दिले. त्यांनी सांगितले की, मंडळाने त्वरित जबाबदारी घ्यावी आणि एका आठवड्यात अहवाल सादर करावा.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी माहिती दिली की, दहिसर, पोयसर, ओशिवरा आणि वालभट नद्या यांचे पुनरुज्जीवन कार्य सुरू आहे. दहिसर नदीसाठी दोन मलजल प्रक्रिया केंद्रांचे काम पूर्ण झाले असून प्रकल्प ३१ मार्च २०२६ पर्यंत कार्यान्वित होईल. पोयसर नदीसाठी १० मलजल प्रक्रिया केंद्रांपैकी नऊ केंद्रांचे काम प्रगतीपथावर आहे. ओशिवरा आणि वालभट नदीसाठी पाच प्रक्रिया केंद्रांची कामे सुरू असून तीही प्रगतीपथावर आहेत.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले की, नदीकिनारी असलेल्या गोठ्यांवर आत्तापर्यंत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तथापि, अनेक गोठ्यांची नोंदणी अद्याप न झाल्याने कारवाईत विलंब होत आहे. दहिसर नदी प्रकल्पात १३०, पोयसरमध्ये २,५५४ आणि ओशिवरा नदी प्रकल्पात ७०० घरे व दुकाने बाधित असून, पात्र बांधकामांच्या पर्यायी सदनिकांअभावी अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया प्रलंबित असल्याचेही त्यांनी सांगितले.

या चर्चेत विधानसभा सदस्य मनिषा चौधरी, योगेश सागर, दिलीप लांडे, अस्लम शेख यांनी सहभाग घेतला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर न.पा. अर्थसंकल्पात कॉरिडोरसाठी दहा कोटींची तरतूद

## २७३ कोटी ४७ लाख रुपयांचा अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपरिषदेची सभासदांस सभा आज शुक्रवारी सकाळी ११ वाजता घेण्यात आली. यामध्ये मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी २७३ कोटी ४७ लाख रुपये चा अर्थसंकल्प मांडला वयात सर्वसाधारण सभेत नगरसेवकांनी मंजुरी दिली.



लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भालके यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा घेण्यात आली. या सभेम ध्ये मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी २०२६/ २७ नगरपरिषदेचा अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये २७३ कोटी ४७ लाख ५६ हजार रुपये जमा.२७३ कोटी ४४ लाख रुपये खर्च तर तीन लाख ५६ हजार रुपये सिलकी अंदाजपत्रक सादर केले. यास सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी देण्यात आले.

कॉरिडोर साठी दहा कोटीची तरतूद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या कॉर्डरसाठी, पंढरपूर नगर परिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये दहा कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. याचा खुलासा करावा अशी मागणी अपक्ष नगरसेवक वंखार जोशी यांनी केली.

झोपडपट्टी व अतिक्रम णावरून खडा जिंगी पंढरपूर शहरामध्ये झोपडपट्टी वाढत आहे अनेक रस्त्यावर अतिक्रम णे वाढत आहेत. पंढरपुरातील नागरिकांना व भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे. अतिक्रमण व झोपडपट्टीवरून सत्ताधारी व विरोधकांमध्ये खडा जंगी,

या अर्थसंकल्प गॅस दाहिनी सुई ते पासून एक लाख रुपये जमा होणार आहेत. उद्यान फी म धून पाच लाख रुपये जमा होणार आहेत. भंगार विक्री मधून तीस लाख रुपये जमा होणार आहे. तर जनरल तलाव दुरुस्तीसाठी दहा लाख रुपये खर्च. गटारी व कचराकुंडी दुरुस्ती पंधरा लाख रुपये, खर्च एमआय तलाव देखभाल खर्च दहा लाख रुपये खर्च. अग्निशामक दल एक लाख रुपये खर्च, अति ते ग्रह दुरुस्ती दहा लाख रुपये खर्च, स्मशानभूमी सुधारणा पंचवीस लाख रुपये खर्च, नालेबांनी ५० लाख रुपये खर्च याची तरतूद करण्यात आली आहे.

# आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत निती आयोगाच्या मुग्धा नरकर यांचा अक्कलकोट तालुक्यास भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : आकांक्षित तालुका कार्यक्रमाच्या संपूर्णतः अभियान २.० च्या प्रभावी अंम लबजावणीस विविध विकासात्मक उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी निती आयोगामार्फत सोलापूर जिल्हातील आकांक्षित अक्कलकोट तालुक्यासाठी नियुक्त. सल्लागार मुग्धा नरकर दि. २६/२/२०१६ रोजी अक्कलकोट तालुक्याला दौरा केला.

या वेळी श्रीमती मुग्धा नरकर यांनी अक्कलकोट तालुक्यातील ग्रामपंचायत जेऊरची पाहणी करून तेथील अंगणवाडी केंद्र तसेच जिल्हा परिषद शाळा येथे प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली. यावेळी संपूर्णतः अभियान २.० च्या अनुषंगाने अंगणवाडी केंद्राम ध्ये शौचालय उपलब्धतता, पानी सुविधा, आहार वाटप, बालकांचे पोषण व्यवस्थापन, मुलांसाठी पूरक पोषका योजनेतंर्गत दिल्या जाणाऱ्या योजनांची व्यवस्था, बालकांच्या वाढ मोजमाप (ग्रोथ मॉनिटरिंग), पूर्व शिक्षणाची गुणवत्ता इ. बाबींचा सविस्तर आढावा घेतला.


तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र जेऊर येथे एएनसी नोंदणी तपासणी, प्रसूतीगृहाची व्यवस्था पाहणी, तसेच उच्च जोखीम गर्भवती महिलांची ओळख व त्यांच्यासाठी उपलब्ध सेवांची पाहनी केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी अभियानाची उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली. आरोग्य, पोषण, शिक्षण, शेती, मूलभूत सुविधा व उपजीविका या प्रमुख क्षेत्रांतील विकास निर्देशांकांमध्ये लक्षित सुधारणा करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. निर्दे शांकांचे सॅच्युरेशन, रिअल-टाईम डेटा मॉनिटरिंग आणि पुराव्यावर आधारित नियोजनाद्वारे ठोस व वेळबद्ध परिणाम साध्य करण्यावर विशेष भर देण्यात आला. मा. गटविकास अधिकारी श्री.शंकर कवितके यांनी विभागांमधील सम न्वय, जबाबदारी निश्चिती आणि नियमित आढावा यंत्रणा मजबूत करण्याबाबत स्पष्ट सूचना दिल्या.

अधिकृत पोर्टलवर वेळेवर अहवाल सादर करणे, क्षेत्रीय पडताळणी करणे आणि शेवटच्या घटकापर्यंत योजनांचा लाभ पोहोचविणे यावर विशेष भर देण्यात आला. क्षेत्रीय कर्मचारी हे शासन योजनांचे प्रत्यक्ष वाहक असल्याने त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद करण्यात आले. सर्व विभागांनी एकत्रित व पारदर्शक पद्धतीने कार्य करण्याचा, समुदाय सहभाग वाढविण्याचा आणि स्थानिक सम स्यांवर नाविन्यपूर्ण उपाययोजना राबविण्याचा सामूहिक संकल्प केला. 'संपूर्णता अभियान २.०' अंतर्गत अक्कलकोट तालुक्याचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. हा कार्यक्रम अक्कलकोट तालुक्याच्या विकासाच्या नव्या टप्प्याची प्रभावी सुरुवात ठरणार आहे.

तद्नंतर ग्रामपंचायत जेऊर येथे भेट देत जनावरांचे लसीकरण ठिकानी भेट देवून लसीकरणाचा आढावा बेल्ला. सोबत जिल्हा परिषद शाळेतील इको क्लब, शाळेच्या आवारातील परसबाग आणि डिजीटल क्लास दुमची पाहणी केली. पंचायत समिती अक्कलकोट येथे तालुकास्तरावरील अधिकारी यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीच्या दरम्यान श्रीमती मुग्धा नरकर यांनी उपस्थितींना मार्गदर्शन देने करजाना सांगितले की, संपूर्णतः अभियान २.० यी ६ निर्देशांक यशस्वीरित्या साध्य करण्यासाठी विभागीय सम न्वयक, नियमित देखरेख, मैदानी फॉलो अप तसेच नियोजित कृती आराखडा चाली प्रभावी अम लबजावणी करण्यासाठी समुदाय सहभागाला समावेश करणे गरजेचे आहे. त्यांनी सर्व विभागांना निर्धारित उदिष्टे व निकषांनुसार वेळेने कार्यवाही करण्याचे, नबोध नवोपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे निर्देष दिले. तसेच डेटा आधारित नियोजन व सातत्यपूर्ण मूल्यांकन प्रणाली अधिक सक्षम करण्यावर त्यांनी विशेष भर देण्याबाबत सांगितले.

यावेळी पंचायत समितीचे मा.गट विकास अधिकारी, महिला व बाल विकास प्रकल्प अधिकरी, तालुका आरोग्य अधिकारी, उप अभियंता ग्रमीण पाणी पुरवठा, तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग पंचायत समिनी, गावचे उप सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, उमेद अभियानाचे तालुका अभियान बलस्थापक, व आंकांक्षित तालुका फेलो यांची उपस्थिती होती.

# नंगपुरामुर्री निवासी शाळेत मराठी कविता लेखन उपक्रम संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा येथे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज यांची जयंती निमित्त मराठी भाषा गौरव दिनानिमित्त स्वरचित मराठी कविता लेखन उपक्रम साजरा करण्यात आला.

यावेळी वर्ग नववी वर्गातील विद्यार्थ्यांनी स्वरचित मराठी कविता तयार करुन प्रदर्शित केल्या. सदर शाळेतील उपक्रमशील व मराठी भाषा विषयाचे अध्यापक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या राबविण्यात आला.

वर्गात तब्बल ३६ विद्यार्थ्यांनी मराठी कविता लेखन केल्या. भाषा, आई, मराठी गौरव दिन, महाराष्ट्र, आपली माती, हिरवे रान, फुले अशा अनेक विषयांवर कविता लेखन केले. त्यामध्ये सहभागी आदित्य कोकोडे, सम्यक सांगोळे,, सुशांत वालदे, गौरव जमदाळ, डेव्हिड जांभूळकर, विक्रांत टेंभूर्णे, तन्मय वासनिक, यथार्थ मेश्राम, युकांत शेंडे, अंश राऊत,

**विद्यार्थ्यांच्या स्वरचित कविता : मराठी भाषा गौरव दिन साजरा**

अथर्व बोरकर, पियुष रामटेके, गौतम खांडेकर, विजय मेश्राम, अजय मेश्राम, धम्मदीप वंजारी, अनंत सुकदेवे, वैभव वंजारी, अनिकेत कोकोडे, अथर्व जांभूळकर, सौरभ साऊस्कार, भावेश नंदेश्वर, रोहिनाथ जांभूळकर, सम्यक घोडीचोर, समंथ भोवते, भावेश चौधरी, युसुफ धिकोडी, आदित भैसारे, मानव गोंडूले, वृषभ वासनिक, कार्तिक नहामुर्ते, भूपेंद्र बावने यांचा सहभाग होता.

सदर उपक्रमाचे कौतुक शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले, नीता भलमे, साधना पारधी, प्रदीप ढवळे, आशिष शहारे, पी ए लांजेवार, कार्तिक शहारे, तुषार महाजन यांनी केले.

# विनोबा ॲप मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल शिक्षिका स्नेहल सरकटे सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : जिल्हा परिषद बुलढाणा व ओपन लिंक फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करार अंतर्गत राबविण्यात येणारा आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम अर्थात विनोबा(बा) ॲपच्या माध्यमातून जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षकांना प्रत्येक महिन्यात प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. जानेवारी महिन्यात बुलढाणा जिल्हयातील मोताळा तालुका स्तरावरील 'पोस्ट ऑफ द मंथ' विजेते शिक्षिका कु. स्नेहल सरकटे (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १ मोताळा) यांना दि २६ फेब्रुवारी रोजी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.


सदरील पुरस्कार मोताळा तालुका गटशिक्षणाधिकारी अधिकारी डी. पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला यावेळी जवरे केंद्रप्रमुख व समग्र शिक्षा मोताळा येथील अधिकारी व कर्मचारी गण तथा आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम चे (वरिष्ठ जिल्हा समन्वयक) शेख नजीर यावेळी उपस्थित होते '

यावेळी शिक्षिका स्नेहल सरकटे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातुन अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

स्नेहल सरकटे यांना या अगोदरही उत्कृष्ट सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव देवून गौरविण्यात आले होते विशेष.

# रिपाई नेते विष्णुदादा भोसले यांच्या सक्षम पाठिंब्यामुळे प्रांत कार्यालयासमोरील आंदोलनास मोठे यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुरंदर::प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : मौजे आंबोडी येथील पीडीत शेतकऱ्यांनी सलग ३७ दिवस दिलेल्या संघर्षमय लढ्याला अखेर यश तहसिलदार यांच्या आदेशाला प्रांतांनी दिली स्थगिती,

रिपाइं नेते विष्णूदादा भोसले यांच्या सक्षम पाठिंब्यामुळे आंदोलनाला मोठे यश, पुरंदर पुरंदर तालुक्यातील मौजे आंबोडी तालुका पुरंदर जिल्हा पुणे येथील महारवतन धारक शेतकरी यांच्या महारवतन वर्ग २ या शेतजमिनी मधून १२ फुटी रस्ता आंबोडी गावचा व पुरंदर तालुक्याशी कसलाही संबंध नसलेल्या अलिकडील काळात जमिन खरेदी केलेल्या उद्योजक इसमास रस्ता मंजूर करण्याचा आदेश पुरंदरचे तहसीलदार विक्रम राजपूत यांनी दिला होता. दिलेला अन्यायकारक आदेश रद्द होवा म्हणून मौजे आंबोडी येथील शेतकरी प्रकाश रणपिसे, चंद्रकांत रणपिसे, अशोक रणपिसे, अरुण रणपिसे व इतर महिला शेतकरी रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेड चे प्रदेश सचिव विष्णू दादा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली गेले ३७ दिवस बेमुदत उपोषणास बसले होते.आंदोलनाच्या ३७ व्या दिवशी पुरंदरच्या प्रांत मॅडम मॅडम यांनी पुरंदरचे तहसीलदार यांनी दिलेल्या आदेशाला दि २४/२/२०२६ रोजी स्थगिती देऊन पीडित शेतकऱ्यांना दिलासा दिला.

?????????????????????

?????????????

# जगतिक पातळीवर मानवता वादाचा विचार मजबूत करण्यासाठी बुद्ध तत्त्वज्ञानाच्या विचारांचीचं गरज : नामदार रामदासजी आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : बुद्ध तत्त्वज्ञानाचा विचार हा मानवतावादी विचार असून जगामध्ये मानवतावाद मजबूत करण्यासाठी बुद्ध तत्त्वज्ञानाच्याचं विचारांची गरज आहे.म्हणूनचं आज जग म्हणत आहे आम्हाला युद्ध नको बुद्ध हवा तेंव्हा अमेरिकेसारख्या देशाने आम्हाला मानवतावाद शिकवू नये कारण अडीच हजार वर्षांपूर्वीच तथागत भगवान गौतम बुद्ध यानी या भारत भूमीतून मानवतेचा समतेचा शांतीचा आणि अहिंसेचा विचार जगाला दिलेला आहे.आम्ही भारतीय हे मनवतावादीच आहोत असे प्रतिपादन देशाचे सामाजिक न्याय व अधिकारता राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार रामदासजी आठवले यांनी किल्लारी तालुका औसा येथे आयोजित धम्म परिषदेत बोलताना केले.

तक्षशीला बुद्ध विहार कमिटी किल्लारी व भंते धम्मसार थेरो यांच्या पुढाकारातून किल्लारी येथील तक्षशिला बुद्ध विहार व तथागत बुद्ध गार्डन किल्लारी या ठिकाणी विशाल पाचव्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या परिषदेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय भिकू संघाचे कार्याध्यक्ष भदन्त उपगुप्त महाथेरो हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून नामदार रामदास आठवले व औसा विधानसभा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार हे होते.

या परिषदेसाठी महाराष्ट्रातून विविध ठिकाणाहून पूज्य भन्ते संघ आलेले होते.प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण व तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तींचे पूजन करून या धम्म परिषदेला सुरुवात करण्यात आली.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नामदार रामदासजी आठवले बोलत होते.पुढे बोलताना ते आपल्या नेहमीच्या चारोळीच्या शैलीमध्ये म्हणाले की मी तर उभा आहे गौतम बुद्धांच्या दारी।

इथे जमली आहे लातूर जिल्ह्यातील जनता सारी ।

मला इतिहास घडवायचा आहे नवा । कारण किल्लारी येथे दिसते आहे तथागतांची हवा ।

माझ्या पाठीशी आहे माझा लाडका भिवा ।

म्हणूनच मला अंधारा मध्ये दिसतो आहे परिवर्तनाचा दिवा।

अशा रितीने तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचाराने मला परिवर्तनाचा नवा इतिहास घडवायचा असून किल्लारी येथील ही धम्म परिषद म्हणजे समाज परिवर्तनाची एक नांदी आहे अशा आशयाची चारोळी त्यांनी या ठिकाणी करून उपस्थित सर्वाना बौद्ध धम्माच्या मार्गाने जाण्याचे आवहान केले तर किल्लारी येथील तक्षशिला बुद्ध विहार हे मानवतेचा विचार देणारे एक संस्कार केंद्र बनविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करूया त्यासाठी



मला जेवढे शक्य आहे तेवढे सहकार्य मी करेन अशा पद्धतीचे आश्वासन या धम्म परिषेदचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना आमदार अभिमन्यू पवार यांनी केले.या परिषदेस लातूर जिल्ह्यातील आणि धाराशिव जिल्ह्यातील बौद्ध उपासक उपासिका हजारोच्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी उपस्थित पूजनीय भिकू संघाची धम्मदेशना झाली या परिषदेचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भंते धम्मसार थेरो व भत्ते सुमित नागसेने यांनी केले तर उपस्थित सर्वांचे आभार परिषदेचे स्वागताध्यक्ष युवराज गायकवाड यानी मानले.

यावेळी रिपाइं (आठवले) पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे,युवा आघाडीचे राज्य अध्यक्ष पप्पू कागदे सह मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते.

# साहित्य माणसाला जगण्याचे बळ देते : कवी शिवाजी बंडगर

## मराठी भाषा गौरवदिनानिमित्त कविता लेखन-सादरीकरण कार्यशाळा उत्साहात; स्पर्धा विजेत्यांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात पंढरपूर श्रमिक पत्रकार संघ व मराठी विभाग यांच्यामधील सामंजस्य करारांतर्गत मराठी भाषा गौरवदिन व कवी कुसुमाग्रज जयंतीनिमित्त कविता लेखन आणि सादरीकरण कौशल्य या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर भाऊराव पाटील, रयतमाउली सौ. लक्ष्मीवहिनी व कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक सुप्रसिद्ध ग्रामीण कवी शिवाजी बंडगर होते. यावेळी दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार सतीश बागल तसेच दैनिक लोकमतचे पत्रकार सचिन कांबळे हे ही उपस्थित होते.

कवी शिवाजी बंडगर यांनी आपल्या प्रभावी सादरीकरणातून साहित्याचे जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. साहित्य माणसाला जगण्याचे बळ देते; समाजजीवनातील विसंगतींवर भाष्य करताना विनोदाची धारही जपली पाहिजे, असे ते म्हणाले. त्यांनी गाजराची पुंगी, आमची बिसूनबाई... तशीच आहे!, रितेपोट, माणदेश माझा आहे किती छान, सुगी आदी कवितांचे गायन केले. शेतकरी जीवनातील संघर्ष अधोरेखित करणारी 'आदलाबदल' ही कविता तसेच 'माणदेशातील डाळिंबावर आधारित लावणी'ला श्रोत्यांची विशेष दाद मिळाली. संतपरंपरेतील अभंगांच्या चालीवर विडंबनात्मक काव्य सादर करून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य केले.

यावेळी पत्रकार सतीश बागल यांनी मराठी भाषेच्या संवर्धनात ग्रामीण समाजाचा मोलाचा वाटा असल्याचे नमूद केले. अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे यांनी मराठी विभागाचा उपक्रम स्तुत्य असल्याचे सांगत अनुभवातून उमटलेली कविता विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरते, असे प्रतिपादन केले.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. दत्तात्रय डांगे यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय कु. मोनिका शिराम यांनी करून दिला. या कार्यक्रमात मराठी विभागातर्फे आयोजित 'ग्रंथ परीक्षण' व 'कविता सादरीकरण' स्पर्धेतील विजेत्यांचा पेन, पुस्तक व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी स्वायत्त महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. आनंद शिंदे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अमर कांबळे, ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य विठ्ठल काटकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास सिनियर, ज्युनिअर व व्होकेशनल विभागातील प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच पदवी व पदव्युत्तर मराठी विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुर्वाक्षी लोंढे यांनी केले, तर आभार कु. धनश्री भोसले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागप्रमुख डॉ. रमेश शिंदे, प्रा. हरिभजन कांबळे, प्रा. अंकुश घुले,



डॉ. बापूसाहेब घोडके, प्रा. सारिका भांगे व प्रा. मोहिनी सावंत, अभिजित जाधव, रामदास भोसले, अमोल माने यांनी विशेष परिश्रम परिश्रम घेतले.

---

## बुलढाणा कोषागारात लाचखोरीचा पर्दाफाश; अप्पर कोषागार अधिकारी प्रविण मोंढे व लिपीक विनोद घट्टे, जिवन काळे, एसीबीच्या जाळ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : बुलढाणा येथील जिल्हा कोषागार कार्यालयात पेन्शन फाईल मंजुरीसाठी लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) ने शुक्रवारी सापळा रचून तिघांना रंगेहात पकडले. या कारवाईत अप्पर कोषागार अधिकारी प्रविण मोंढे लिपीक विनोद घट्टे व जीवन काळे यांचा समावेश आहे.




तक्रारदाराकडून पेन्शनची फाईल मंजूर करण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी २० हजार रुपयांची मागणी केल्याचे समोर आले. याबाबत तक्रारदाराने उइ कडे धाव घेतली. प्राथमिक पडताळणीनंतर ACB पथकाने सापळा रचला आणि १५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना आरोपींना ताब्यात घेतले.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास उइ कडून केला जात आहे. या कारवाईमुळे जिल्हा कोषागार कार्यालयात एकच खळबळ उडाली आहे.

शासकीय कार्यालयातील लाचखोरीविरोधात कठोर कारवाई करण्यात येत असून नागरिकांनी अशा प्रकारच्या तक्रारी निर्धास्तपणे नोंदवाव्यात, असे आवाहन उइ कडून करण्यात आले आहे.

---

## खामसवाडीचे विश्वजीत शेळके यांची महाराष्ट्र ग्रामीण बँक व्यवस्थापक म्हणून निवड झाल्याबद्दल मराठी पत्रकार परिषदच्या वतीने सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब:प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : खामसवाडी येथील शेतकरी कुटुंबातील विश्वजीत काकासाहेब शेळके यांची बँकेसाठी असलेल्या आय बी पी एस परीक्षेमधून निवड झाली आहे त्यांच्या या यशाबद्दल कळंब येथे मराठी पत्रकार परिषद मुंबई सलग्न धाराशिव प्रेस क्लब शाखा कळंबच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन व कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे औचित्य साधून ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, पत्रकार परिषद कळंब शाखा अध्यक्ष अमर चोंदे पत्रकार माधवसिंग राजपूत यांच्या हस्ते शाल, पुष्पहार , जीवनातील श्वासासाठी हे भंवरलाल जैन यांचे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महादेव महाराज अडसूळ, माधवसिंग राजपूत, हनुमंत पाटोळे यांनी यांनी कठोर परिश्रमातून व ग्रामीण भागात शिक्षण घेऊन मिळवलेल्या यशाबद्दल शेळके यांची अभिनंदन केले व मराठी भाषा गौरव दिनाबद्दल शुभेच्छा दिल्या व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन, पत्रकार शिवप्रसाद बियाणी यांनी तर आभार पत्रकार शिवाजी बोबडे यांनी मानले कार्यक्रमासाठी पत्रकार दीपक माळी, महेश फाटक, बाबासाहेब शेळके, सोमनाथ शेळके यांची उपस्थिती होती.

---



## खामसवाडी येथील श्री कोचिंग क्लासेसच्या वतीने विश्वजीत शेळके यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी: प्रतिनिधी/ हनुमंत पाटुळे : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील विश्वजीत काकासाहेब शेळके यांची महाराष्ट्र ग्रामीण बँक प्रोबेशनरी अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार श्री कोचिंग क्लासेस च्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी विश्वजीत शेळके व त्यांचे पालक श्री काकासाहेब शेळके यांचा सत्कार कोचिंग क्लासेसचे संचालक प्रशांत सुरवसे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे सहशिक्षक नागनाथ शेळके, शिक्षण प्रेमी नागरीक भागवत शेळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी विश्वजीत शेळके यांनी श्री. कोचिंग क्लासेस मधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना आय. बी.पी.एस. म्हणजे काय ? त्या परीक्षेचे स्वरूप नेमके कसे असते? त्या क्षेत्रातील नोकरीच्या संधी कशा प्रकारच्या असतात? परीक्षा देण्यासाठी काय पूर्वतयारी करावी लागते या बाबत मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील निवडी बद्दल विश्वजीत शेळके यांचे सर्व स्तरातील अभिनंदन होत आहे.

---

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात विविध कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील विनायक दामोदर सावरकर क्रांतिकारक, विचारवंत आणि साहित्यिक म्हणून ओळखले जातात,त्यांच्या व्यक्तिमत्त्वात धैर्य, संघटनशक्ती आणि तत्त्वनिष्ठा यांचा सुंदर संगम दिसून येत असल्यामुळे पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात त्यांच्या पुण्यतिथी निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सेमी इंग्लिश विभाग प्राथमिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिमापूजन, व्याख्यान व चित्रपट आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे, दिगंबर जगताप उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांनी लुटला चित्रपट पाहण्याचा निखळ आनंद

**सौ सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवन कार्यावर प्रदर्शित झालेला चित्रपट दाखविण्यात आला चित्रपट पाहण्याचा विद्यार्थ्यांनी निखळ आनंद लुटला.**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केल्यानंतर ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, सावरकरांनी अभिनव भारत ही गुप्त क्रांतिकारी संघटना स्थापन करून तरुणांना सशस्त्र क्रांतीसाठी प्रेरित केले.

ब्रिटिश सरकारने त्यांना अंदमानातील सेल्युलर तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा दिली. तुरुंगात असताना त्यांनी अनेक कविता आणि साहित्यनिर्मिती केली. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी कार्य केले तसेच पतितपावन मंदिर उभारून सर्व समाजघटकांना प्रवेश दिला. त्यांच्या लेखन, भाषण आणि कृतीतून देशभक्ती, स्वाभिमान आणि सामाजिक जागृतीचा संदेश मिळतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक निशिगंधा सोमेश्वर यांनी केले, सूत्रसंचलन कल्पना स्वामी यांनी केले आभार मनिषा सुरवसे यांनी मानले. कार्यक्रमास सिद्रामप्पा पाटील, राजकुमार गवळी, रविकिरण दंतकाळे, श्रीदेवी मयनाळे आदी उपस्थित होते.

---


## सीएसबी बँकेचे एग्रीकल्चर फिल्ड ऑफिसर ऋषिकेश बागल यांचा नागेश फाटे यांच्या हस्ते सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील गादेगाव येथील अरुण पांडुरंग बागल यांचे चिरंजीव ऋषिकेश बागल यांची नुकतीच सीएसबी बँकेच्या ग्रीकल्चर फिल्ड ऑफिसरपदी निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी ऋषिकेश बागल यांचे वडील अरुण बागल यांचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी शेतकरी संघटनेचे नेते समाधान फाटे, अरुण मोलाने, सुधाकर बागल, बाळासाहेब बागल, भास्कर गायकवाड, डॉ. संजय बागल, अरुण बागल, अतुल फाटे आदी उपस्थित होते.



---

## पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई



# वाळू माफिया सुरज हरिभाऊ शिंदे वर्षे यास एमपीडीए कायद्यांतर्गत अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुका पोलीस ठाणे कडून एम पी डी ए महाराष्ट्र झोपडपट्टी दादा औषधी द्रव्य विषय गुन्हेगार वाळू तस्कर यांच्या कृत्यांना प्रतिबंध अधिनियम १९८१ कलम ३ कायदया अर्तगत पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हदीतील वाळु माफीया व सराईत गुन्हेगार सुरज हरिभाऊ शिंदे तालुका पंढरपूर यास एम पी डी ए कायदयाअर्तगत स्थानबध्द करून येरवाडा जेल येथे रवाना केले.

इसमनामे सुरज हरिभाऊ शिंदे राहणार आणवली सोलापुर हा कुठल्याही प्रकारचा वैदय उदयोग धंदा अगर व्यवसाय करीत नाही. पंढरपुर तालुका हददीतील मौजे आझेवाडी, पंढरपूर, व शहर आसपासचे परीसरात भिमा नदी व माण नदी पात्रातुन वाळु चोरी करून त्याची विक्री करून त्यातुन मिळणारे पैशाचे जोरावर परीसरातील सर्वसामान्य जनतेत भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्याच्या कृत्यामुळे पंढरपुर तालुका व शहराचे आसपासचे परीसरातील सार्वजनिक लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात दमदाटी करणे भीतीचे वातावरण तयार करणे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना त्रासदायक झाले होते. सुरज हरिभाऊ शिंदे याने पंढरपुर तालुका व शहराचे आसपासचे परीसरात दहशतीचे कृत्य करून त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधक असा वाळु तस्कर म्हणुन स्वतःला सिध्द केले होते. सदर आरोपी यांचे विरुध्द पंढरपूर तालुका, व इतर पोलीस ठाणे अर्तगत एकुण ११ गुन्हे दाखल असुन त्यामध्ये सरकारी कामात अढथळा करणे, चोरी करणे, वाळु तस्करी करणे, व सर्व सामान्य लोकांमध्ये दहशत निर्मान करणे असे वेगवेळ्या प्रकारचे गुन्हे दाखल होते.

त्याअनुषंगाने सदर आरोपी विरुद्ध एम पी डी ए कायद्यांतर्गत कारवाई करणे व त्याच्या कृत्यांना आळा घाळणे अत्यंत आवश्यक असल्याने सुरज हरिभाऊ शिंदे वय २६ राहणार अनवली तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर जि सोलापुर यास एम.पी.डी.ए. कायदयाअतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव मा. पोलीस अधिक्षक श्री अतुल कुलकर्णी सो, यांनी मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सो सोलापूर यांना पाठविण्यात आलेला होता. दरम्यान मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सो सोलापूर यांनी एम पी डी ए कायदयातील तरतुदीनुसार आरोपी नामे सुरज हरिभाऊ शिंदे वय २६ वर्षे राहणार अनवली तालुका पंढरपूर जि सोलापुर याचे विरुध्द स्थानबध्दतेचा आदेश केलेप्रमाणे आरोपी यास ताब्यात घेवुन एम पी डी ए कायदयाअतर्गत कारवाई करुन त्यास २६ फेब्रुवारी २०२६रोजी ताब्यात घेऊन अटक करून दिनांक २७फेब्रुवारी २०२६ रोजी मध्य रात्री येरवडा कारागृह पुणे येथे स्थानबध्द करणेकामी रवाना करण्यात आलेले आहे. सदरची कारवाई मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी श्री कुमार आशीर्वाद सो सोलापूर यांचे आदेशान्वये मा. पोलीस अधिक्षक श्री अतुल कुलकर्णी सो, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री प्रितम यावलकर सो, मा. उपविभागिय पोलीस अधिकारी श्री प्रशांत डगळे सो पोलीस निरीक्षक श्री संजय जगताप साहेब डउइसोलापूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली

पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक टी. वाय. मुजावर, झख श्रीमती विभावरी रेळेकर मॅडम पोसई भारत भोसले, पोसई विक्रम वडणे, पोलीस उपनिरीक्षक कवितकर पोसई . सहा. फौजदार विजयकुमार गायकवाड पोलीस हेडकॉन्स्टेबल अनिस शेख स्थानिक गुन्हे शाखा पोहेकॉ/१४१५ मंगेश रोकडे, पोहेकॉ/१७९२ दिपक भोसले, पोलीस हवालदार सुहास देशमुख स्वप्निल वाडदेकर पोकॉ/२११६ सागर गवळी, संजय गुटाळ चालक पोकॉ/७१९हासेन नदाफ, चालक पोकॉ विलास घाडगे/विजयकुमार आवटी संतोष चव्हाण पोलीस हवालदार तात्यासाहेब गायकवाड सुजित उबाळेपाटील बाजीराव काकडे सायबर सेलचे पोलीस हवालदार रतन जाधव वसंत कांबळे यांचे पथकाने केली आहे.